प्रकरण तीन

# मोहन पाटील यांच्या लघुकादंबऱ्यांतील वातावरण आणि व्यक्तिरेखा

## प्रकरण तीन

# मोहन पाटील यांच्या लघुकादंबऱ्यांतील वातावरण आणि व्यक्तिरेखा

ग्रामीण साहित्यात नवे भान ठेवून वेगळ्या आशयाचे आणि अनुभूतीचे लेखन करणाऱ्यामध्ये मोहन पाटील यांचे स्थान निश्चित वरचे आहे. त्यांनी आपल्या लघुकादंबऱ्यातून ग्रामीण जीवनाचे यथार्थ दर्शन घडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या साहित्यातून ग्रामीण वातावरण प्रकट होताना दिसते.

प्रस्तुत प्रकरणातून मोहन पाटील यांच्या लघु कादंबऱ्यांतून चित्रित होणारे ग्रामीण वातावरण आगि त्यक्तिरेखा यांचा अभ्यास करावयाचा आहे. मोहन पाटलांनी ग्रामीण जीवनाची अनुभूती घेतल्यामुळे त्यांचे अनुभव विश्व समृद्ध आहे. त्यामुळे ते आपल्या लघुकादंबऱ्यांतून जिवंत असे चित्र रेखाटून सर्व व्यक्तिरेखांना स्वत:चे असे अस्तित्व प्राप्त करुन देतात. त्यामुळे त्यांच्या लघुकादंबऱ्यांना निश्चितच एक दर्जा प्राप्त होतो. सुरुवातीस आपण त्यांच्या लघुकादंबरीतील वातावरण निर्मिती या घटकाचा विचार करु.

**वातावरण :**

साहित्यातील वातावरण हा घटक कोणत्याही साहित्यकृतीला जिवंतपणा प्राप्त करून देण्याच्या दृष्टिकोनातून फार महत्त्वाचा ठरतो. कोणतीही साहित्यकृती ही एका विशिष्ट भौगोलिक तसेच सामाजिक व सांस्कृतिक परिसरात घडत असते. त्या परिसराचा सुगंध घेऊन आकाराला येत असते. वातावरण हा साहित्यनिर्मितीतील क्रियाशील घटक असतो जसे नाटकाला जिवंतपण देण्यासाठी नेपथ्य वगैरे घटकांची नितांत आवश्यकता असते. कथात्मक साहित्यातही वातावरण निर्मिती महत्वाची ठरत असते.

बऱ्याचदा लघुकादंबरीमध्ये कल्पित परिसर निर्माण केलेला असतो जर अशावेळी 'वातारण' हा घटक सामर्थ्यपूर्ण असेल तर ती कल्पित लघुकादंबरीही वातावरण निर्मितीमुळे कल्पतेच्या पातळीवरून वास्तविक पातळीवरची भासू लागते. यातूनच पात्रांच्या जीवनकथेला एक आधारभूमी प्राप्त होत असते.लघुकादंबरीमध्ये पात्र, घटना, प्रसंग, नाट्य संघर्ष, याबाबत

वातावरण हा घटक महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडत असतो. विशेषत: मोहन पाटलांच्या लघुकादंबरीच्या संदर्भातील व्यक्त होणारे ग्रामीण वातावरण आशयसूत्रांवर प्रभावी परिणाम करणारे आहे.

i) **परिसर चित्रण :**

मोहन पाटील आपल्या भाषाशैली आणि निवेदन शैलीतून ग्रामीण वातावरण निर्माण करताच त्याचबरोबर ग्रामीण परिसराच्या वर्णनातूनही वातावरण निर्मितीला योग्य परिणाम साधण्याचा प्रयत्न करतात. मोहन पाटील यांच्या लघुकादंबरीचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या लघुकादंबऱ्यांचे कथानक हे कर्नाटक महाराष्ट्राच्या सीमारेषेवरील ग्रामीण जीवनात घडले आहे. त्यामुळे या परिसरातील वातावरण, ग्रामीण जीवन, ग्रामीण राजकारण, धार्मिक, सामाजिक वातावरण त्यांच्या लघुकादंबऱ्यातून प्रकट होताना दिसते.

'गल्लीभर मृगाची दुपारी पसरली होती. गल्लीतली सगळी घरं आतल्या आत हसत आहेत. असं त्याला वाटू लागलं गल्लीच्या टोकापर्यंत निवांत दुपार पसरली होती. घराघरातली मानणसं उद्योगधंद्याला बाहेर पडली होती. समोरच्या रस्त्यावर सुट्टीत गोट्या खेळायसाठी गल्लीतल्या पोरांनी पाडलेली गद रिकामी वाटत होती.'[१] अशाप्रकारच्या वर्णनातून मोहन पाटील वातावरण निर्मितीचा वेगळा परिणाम साधतात. या वर्णनावरून लक्षात येते की, मोहन पाटील यांना उदासिनतेचे भाव व्यक्त करायचे आहेत. अशा वर्णनावरून वाचकांच्या मनात उदासिन, खिन्न, हताश यासारखे भाव तरळून जातात. मोहन पाटील हे स्वतंत्र अभिव्यक्ती असणारे लेखक आहेत. हेच यावरून जाणवते. हे वर्णन जरी विशिष्ट भागाचे असले तरी ते जानूच्या मनाची अवस्था, उदासिनता प्रकट करते. पुढाऱ्याकडून फसविलेला, आणि हतबल, अगतिक असणारा जानू यातून मोहन पाटील साकार करतात.

असेच आणखी एक उदाहरण बघू.

'सायकलीच्या गतीबरोबर बापूच्या मनात विचारांची वावटळ उठली. त्या वावटळीचा जोर अफाट होता. त्या वावटळीत सापडून अक्कातंगीचा माळ वावचडीगत उडून कुठल्या कुठं जाईल? ही भीती त्याच्या मनांत दाटू लागली. तो नेट करून सायकल मारू लागला. तसा

सगळा माळ तबकडीगत त्याच्याभोवती गरगर फिरतो आहे असं त्याला वाटलं. भोवतीची गावं, मळ्यातल्या वस्त्या, कुठं, कुठं ओलीताखाली आलेले जमीनीचे हिरवे तुकडे आपल्या भोवती गरगरताहेत. ही गती कोण थांबविणार ? सगळा माळ फिरतोय. आणि याच्या किल्या पैसे वाल्यापाशी. त्यांनीच गती दिली. मग थांबवायचं म्हटलं तर कुणी?' [२]

वरील वर्णनातून मोहन पाटील बापूच्या मनाची अवस्था सांगत असताना वातावरण निर्मिती करतात. बापूच्या भोवतीच्या परिसराचा वापर करून मोहन पाटील त्याच्या मनाच्या अवस्थेला अधिक प्रभावीपणे मांडण्यात यशस्वी ठरले आहेत.

ii) **निसर्गचित्रण :**

ग्रामीण जीवन व निसर्ग यांचा फार निकटचासंबंध आहे. आधुनिक युगातही यांत्रिक युग सुरू झाले असले तरी ग्रामीण जीवन निसर्गापासून दूर गेलेले नाही व ते जाईल असे तूर्तास तरी वाटत नाही.

ग्रामीण भागातली माणसे विलक्षण भावनाप्रधान असतात आणि हा त्यांचा भावनात्मक सेतूबंध निसर्गाशी थेट जोडलेला असतो. एक प्रकारचे अदृश्य अशा शक्तीनं ग्रामीण माणसाचे जीवन निसर्गाशी जोडलेले असते. त्यामुळे निसर्गातल्या हालचालीचा त्यांच्या मनावर सारखा परिणाम होत राहतो.

निसर्ग आणि माती यांच्याशी ग्रामीण जीवनाचे जेवढे अतूट नि सनातन नाते आहे तेवढेच ग्रामीण साहित्याचे आणि निसर्गाचे आहे. आपल्या साहित्याला ग्रामीणतेचा स्पर्श नि चेहरामोहरा प्राप्त व्हावा, असे वाटणाऱ्या हरेक लेखकाने त्या त्या परिसरातील निसर्गाचा आपल्या निर्मितीत सुरेख वापर केलेला आहे. मोहन पाटीलही याला अपवाद नाहीत. निसर्गाचा स्पर्श झाल्याशिवाय ग्रामीणता ठळक स्वरूपात साकार होत नाही हेच यातून सिद्ध होते.

प्रारंभी काळातील ग्रामीण साहित्यातील निसर्ग हा एक घटक म्हणून येत नव्हता, तर पार्श्वभूमी म्हणून तो अवतरत होता. कलाकृतीला सौंदर्य प्राप्त व्हावे म्हणून, कल्पकतेचा प्रसन्न आविष्कार दाखविण्याचे एक साधन म्हणून ग्रामीण साहित्यात निसर्ग येत होता. त्याचे

स्थान त्या निर्मितीमध्ये अपरिहार्य स्वरूपाचे नसे. आशयाला आभूषित करणाऱ्या बाह्य अलंकाराप्रमाणे निसर्गाचे स्थान असे. अलिकडे मात्र निसर्गाचा वापर करण्याच्या प्रवृत्तीत अमूलाग्र बदल झालेला आहे.

आज ग्रामीण साहित्यात येणारा निसर्ग आशयाचा नि अभिव्यक्तिचा एक अपरिहार्य घटकम्हणून येतो आहे. निसर्गाचा मानवी जीवनावर होणारा परिणाम आता साहित्याचा विषय बनत आहे. त्यातूनच दुष्काळ, अतिवृष्टी, भूकंप, यासारख्या निसर्गाच्या लिलांचा ग्रामीण जीवनावर होणारा परिणाम साहित्याचा विषय बनत आहे. त्यातूनच ग्रामीण जीवनातील नव्या जाणीवांना वाचा फुटत आहे.

मोहन पाटील यांची साहित्यिक नाळ ग्रामीण जीवनाशी जुळलेली असल्यामुळे साहाजिकच त्यांच्या लघुकादंबऱ्यातून वेळोवेळी निसर्ग डोकावताना दिसतो. कधी तो मनाला मोहविणारा मोहक ठरतो तर कधी आपल्या एकाच लहरीने सामान्य शेतकऱ्याची दैना उडविणारा रौद्र वाटतो. मोहन पाटील यांनी ढोबळ निसर्ग वर्णनापेक्षा सूक्ष्म निसर्गाचा आपल्या अनुभवाच्या आविष्कारासाठी कलात्मक वापर केलेला आहे. जो ग्रामीण साहित्याच्या समृद्धिच्या दृष्टिकोणातून महत्त्वाचा ठरतो.

'तिन्हीसांज टळून गेली होती. आभार मातकट दिसू लागलं. जानू बसून होता. झाडणीनं झाडून काढलेल्या काळ्या बोचऱ्या गोंडासारखा हळू हळू अंधार जूम लागला खळ्याभोवती माळ अंधारानं गुरफटला.'[३]

वरील ओळीतून मोहन पाटील निसर्गचित्रण करतात. तिन्हिसांज टळून गेली होती. त्यावेळेचे वर्णन करतान मोहन पाटील केवळ किती वेळ झाला हे सांगून थांबत नाहीत तर त्यावेळेला ग्रामीण जीवनातील कृतीशी सांगड घालून ग्रामीण साज चढविण्याचा प्रयत्न करतात. झाडणीनं गोंड झाडून एकत्र करावेत तसा अंधार दाटून आला होता. एकूणच ग्रामीणतेचा साज चढवत असतान अंधाराला नकळत गडद करण्यामध्ये मोहन पाटील बाजी मारतात. यातूनच त्यांच्या ग्रामीण साहित्यातील लेखनसामर्थ्याची कल्पना येऊ शकते.

'काठावर राहून नदीचा प्रवाह डोळ्यांत भरून घेतला वरच्या धरणातनं सोडलेला फेसाळ, सफेद रंगाचा अटकर अंगाचा ताशीव पट्टा. हिरव्यागार मळीतून वहातेला पार खाली सरकारी मळी संपते तिथून पूढे चिंचोळा शेपटासारखा वळलेला तिथे तर चांदीचा चकचकीत वाळाच तयार झालेला.'[४]

यासारख्या वर्णनातून मोहन पाटील निसर्गाचा मुक्त आविष्कार शब्दबद्ध करताना दिसतात. नदीचं वाहणं किती सौंदर्यात्मक असू शकते याची प्रचिती माहेन पाटील यांच्या वरील वर्णनातून जाणवते. नदीच्या भर उन्हात चकाकणाऱ्या प्रवाहाला चांदीच्या वाळ्याची उपमा मोहन पाटील देतात.

लेखक केवळ निसर्गातील सौंदर्यचे वर्णन करत नाहीत तर त्या सौंदर्यापलीकडे लपलेला निसर्गाचा लहरीपणा, रौद्र रुपही वर्णन करतात. निसर्ग वाटतो तेवढा सौंदर्यात्मक आहे पण त्याचे भीषण रुपही आहे. वरील वर्णनातून आविष्कृत होणारी नदी शेतकऱ्यांची चिंता वाढविणारी ठरते.

'पाणी कपात सुरू झाली नदीवरचं थोरलं जॅकवेल थंड पडलं नदीत पाण्याचा खडखडाट उलाडा. पात्रावळी वाळू , थोरल्या कासवाच्या पाठीसाराखी दिसणारी खडकं उघडीबोडकी, दिसाय लागली सखलात पाण्याची डबकी साचली. त्या घाण पाण्यावर माश्यांचे, चिलटाघुंगरटांचे थवे बसू लागले. सबंध नदीच मेलेल्या जनावराच्या सांगाड्यागत उपडी पडली. आणि वरनं उन ताव मारु लागलं दांडगा उन्हाळा पडला.'[५]

वरील वर्णनातून मोहन पाटील नदीच्या कोरड्या पडलेल्या पात्राचे वर्णन करतात. मोहन पाटील केवळ वर्णन करून थांबत नाहीत. तर निसर्गाचे रौद्र भीषण रुपही सांगतात. त्यासाठी नदीच्या कोरड्या पडलेल्या पात्राला मेलेल्या जनावराच्या सांगाड्याची उपमा देतात.

शेतकऱ्यांच्या दृष्टीने उन्हाळ्याचा काळ हा परीक्षेचा काळ असतो. पिकाला योग्यवेळी पाणी मिळाले नाही तर पिकाचे नुकसान होते. त्यातल्या त्यात ज्या गावाला नदी असते तिथे शेतकऱ्यांना थोडासा दिलासा मिळतो पण या उन्हातही नदीचं पाणी अटतं पात्र

कोरडं पडतं. वरून तावणारं ऊन आणि पिकांना कमी पडणारं पाणी यामुळे पिकांची जगण्यासाठी धडपड सुरू होते आणि पिक वाचविण्यासाठी शेतकऱ्याची तगमग होऊ लागते.

मोहन पाटलांनी नेमका हाच मुद्दा महत्त्वाचा मानला आहे. आणि लिगाड सारख्या लघुकादंबरीची गुंफण केली आहे. म्हणजे केवळ ग्रामीण भागातला निसर्ग, त्यांचं सौंदर्य, आल्हाददायकपणा न टिपता त्याच्या पलीकडे असणारा निसर्ग अधिक उठावदार करण्याचा प्रयत्न केला आहे. आणि मग या निसर्गाच्या लहरीपणातून निर्माण होणाऱ्या समस्या, शेतकऱ्यांपूढचे पेच प्रसंग, त्याच्या जीवाची तगमग, घालमेल टिपण्याचा प्रयत्न केला आहे. जो रूढ ग्रामीण साहित्याच्या परंपरेला फाटा देऊन आपले वेगळेपण सिद्ध करणारा आहे.

मोहन पाटील यांच्या लघुकादंबीरतील वातावरण या घटकाचा विचार केल्यानंतर आता आपण त्यांनी चित्रित केलेल्या व्यक्तिरेखांचा अभ्यास करु.

**व्यक्तिरेखा :**

मोहन पाटील यांच्या लघूकादंबऱ्यांचे महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे त्यांनी साकारलेल्या व्यक्तिरेखा. व्यक्तिरेखा चित्रणामध्ये त्यांचा असा एक खास हातखंडा आहे. त्यातून ते आपले कौशल्य सिद्ध करताना दिसतात. प्रस्तुत प्रकरणातून आपल्याला या व्यक्तिरेखा चित्रणाची वैशिष्टये अभ्यासावयाची आहेत. त्यामुळे मोहन पाटील यांचे लघुकादंम्बरी लेखणातील वेगळेपण लक्षात येईल. व्यक्तिचित्रण हा लघुकादंबरीतील महत्त्वाचा घटक आहे. कारण व्यक्तिचित्रणाच्या आश्रयानेच लघुकादंबरीचे आशयासूत्र आणि कथानक सिद्ध होत असते. लघुकादंबरीतील येणाऱ्या पात्रांचे प्रमुख कार्य कथानकाच्या निर्मितीला हातभार लावून ते कथानक जिवंत बनविण्याचे असते. व्यक्तिचित्रण हे हुबेहुब रेखाटने किंवा त्या व्यक्तीच्या सर्वांगीन घटकासह ती लघुकादंबरीत उतरविणे हे लेखकासमोरचे फार मोटे आव्हान असते यासाठी लेखकाला ती व्यक्ती भावली पाहिजे तिची वृत्ती, कृती, भावना, विचार, कल्पना, संवेदना,जीवनदृष्टी, जीवन पद्धती इत्यादींच्या दृष्टीकोनातून त्या व्यक्तीची शब्दरुप प्रतिमा लघुकादंबरीत साकारावी लागते.

कथानकात ही पात्रे शब्दरुप असली तरी त्यांना प्रत्यक्ष वास्तवातील माणसाप्रमाणे शारिरीक, मानसिक व सामाजिक अंगे लाभलेली असतात. कथानकातील प्रत्येक पात्राला स्वतःचे वैशिष्ट्यपूर्ण असे भावविश्व किंवा व्यक्तिमत्त्व लाभलेले असते. परंतु हे पात्र प्रत्यक्षातील व्यक्तीप्रमाणे स्वतंत्र नसते. लघुकादंबरी या संबंधाची निर्मिती हे त्याचे कार्य असल्याने ते त्या त्या संदर्भात कथानकाला क्रियाशील असते. तसेच दुसऱ्या अंगाने हे पात्र प्रत्यक्षातील मानवी जीवनाशी किंवा भावविश्वाशी एक विशिष्ट प्रकारचे नाते प्रस्थापीत करीत असते. त्यामुळे ही पात्रे जिवंत वाटतात. कृत्रीमता त्यांच्यात आढळून येत नाही. याविषयी चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात.

'जे जीवन कादंबरीत रांगविलेले असते त्यानुसार गौण पात्रांचे किंवा प्रमुख पात्रांचे व्यक्तीदर्शन घडविलेले असते. कादंबरीतील पात्रे वास्तव व जिवंत असावीत व त्यांचे वागणे त्यांच्या स्वभावाशी सुसंगत असावेत. वाचकांसमोर ती मुर्तीमंत साकार व्हावीत एवढीच अपेक्षा त्यात असते.'[६]

एकूणच लघुकादंबरीचा टवटवीतपणा, नैसर्गिकपणा हा त्या लघुकादंबरीत शब्दरुप केलेल्या पात्रांवर बहुतांशी अवलंबून असतो असे म्हणता येते.

लघुकादंबरीकाराला पात्र निर्माण करीत असतातना काही नैसर्गिक मर्यादा असतात. मर्यादित अवकाशातच नेमकेपणाने व्यक्तिवैशिष्ट्ये दाखवित आशयसूत्राला अनुसरून पात्रनिर्मिती करणे हे लेखकासमोरील कलात्मक आव्हान असते.

मोहन पाटील यांच्या लघुकादंबरीतील व्यक्तीचित्रणांचा अभ्यास मांडताना. अभ्यासाच्या सोईसाठी व्यक्तिरेखांचे खालीलप्रमाणे ढोबळमानाने वर्गीकरण केलेले आहे.

अ. शोषण व्यवस्थेला बळी पडलेल्या व्यक्तिरेखा जानू, रघू, शिवा, लगम्या, बजरंग, लकुळ्या, चांभार.

ब. सत्तापिसासू आणि स्वार्थी व्यक्तिरेखा :- दाजीतात्या, धोंडीनाना, शंकर मांगुरे

क. स्त्री व्यक्तिरेखा :- मंजुळा, शकी, शकीची म्हातारी आई, भागिरथी, राधी.

ड. इतर काही लक्षणीय व्यक्तिरेखा :- नंगरी बळीशा, रघूचे वडिल, बापू,

## अ) शोषण व्यवस्थेला बळी पडलेल्या व्यक्तिरेखा :

भारतीय स्वातंत्र्यानंतर सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन ग्रामीण भागापर्यंत राजकारण पोहचले. लोकशाही पद्धतीमुळे प्रत्येक व्यक्तिला महत्त्व प्राप्त झाले. व्यक्तिच्या मताला महत्त्व प्राप्त झाले आणि यातूनच मतांचे राजकारण सुरू झाले. सत्ता संघर्षाला सुरूवात झाली. राजकीय सत्तेतून अर्थसत्ता निर्माण झाली आणि नवा शोषणकर्त्यांचा वर्ग तयार झाला. त्याला अधिकांश बळी पडला तो ग्रामीण भागातील सामान्य कष्टकरी शेतकरी मजुर वर्ग. मोहन पाटील यांनी आपल्या लघुकादंबरीतून अशाच शोषण व्यवस्थेला बळी पडलेल्या व्यक्तिरेखा मांडल्या आहेत. यापैकी 'जानू' ही व्यक्तिरेखा आपले अधिक लक्ष वेधून घेते.

'कोंडमारा' या 'पाचुंदा' तील पहिल्या लघुकादंबरीतील जानू ही प्रमुख व्यक्तिरेखा आहे. जानू पाटील च्या आडनावात 'पाटील' असले तरी तो वास्तविक जीवनात पिडलेला, नडलेला, शोषित असा सामान्य शेतकरी आहे. जानू अल्पभूधारक आहे शेती हा त्याचा परंपरागत व्यवसाय आहे. परंतु त्यात प्रगती काहीच नाही. 'अंग मोडून काम कर आणि पोटभर खा.' असा विचार करून जानूच्या पूर्वजांनी रान शिल्लकी ठेवलेलं गावात घर आणि माळावर रान होते. ग्रामीण जीवनाच्या दृष्टीकोनातून ही एक मोठी प्रतिष्ठेची बाब. पण जानूसाठी ती प्रतिष्ठा नव्हती ती स्वत: जगणे आणि कुटूंबाला जगविण्यासाठीचं आव्हान होते. जे रडत, कढत, गहान ठेवत जानू पेलत होता. वर्षभर तो शेतीत राब राब राबायचा पीक काढायचा पण उत्पन्न किती ? मोहन पाटील जानूच्या शब्दात सांगतात. 'सालभर रानांत उठाबशा काढायच्या, नांगरट कुळवट करून हाडं मोडून घ्यायची माती फोलाट करून पावसाची वाट बघायची डोळ्यात जीव गोळा करून राखेतलं बी मातीआड झाकायचं आणि घरची जोडणी नाही म्हणून बैलवाल्याच्या पाया पडून कुणाच्या तरी खळ्यावर सुगी उरकून घ्यायची. अशी उस्तवारी करून अखेर शेवटी दाणं किती? तर हे पुढ्यात पडलेलं सालभरचं पोटं'[७]

वर्षभर स्वत:च्या शेतात राबूनही दाणं किती पसाभर. जानूच्या दयनीय अवस्थेचे वर्णन मोहन पाटील अगदी मोजक्या शब्दात करतात.

जानूची पत्नी मंजूळा ही सहा महिन्यांची गरोदर असते. एके रात्री तिच्या पोटात अचानक दुखणे सुरू होते. ती जानूला सांगते पण जानू तिकडे लक्ष देत नाही. इतक्यात जानूचा मित्र दिनकर उड्या मारत जानूकडे येतो आणि गावाला कारखाना मंजूर झाला म्हणून पुढाऱ्यांची गावातून मिरवणूक काढली आहे. त्या मिरवणूकीत सहभागी होण्यास जानूला गळ घालतो. सुरवातीला मंजूळेच्या काळजीनं जानू नकार देतो. पण दिनाच्या आग्रहामुळे तो मिरवणूकीला निघून जातो. मिरवणुकीत त्याला मंजूळेचा विचार येऊ लागतो आणि तो माघारी फिरण्याचा प्रयत्न करू लागतो तेव्हा दिना त्याला जे सांगतो त्यावरून जानू सारखे सामान्य शेतकरी शोषण व्यवस्थेला कसे बळी पडतात. याचा प्रत्यय येतो.

दिना सांगातो, 'शान्या हिच येळ हाय कारखाना मंजूर झालाय. उद्या गावातली हीच माणसं खासदारापुढं उठबस करणारी हाईत खासदारापुढं हेचं वशिलं हाईत ह्येच्या पुढं पुढं केलं तरच आपल्या सारख्याचा फायदा , न्हाईतर उद्या आमाला ही इचारनार सुद्धा न्हाई'[८]

दिना एका अर्थी शोषण व्यवस्थेचे फायदे जानूला समजावून सांगत होता. पूढे जानूला ऊस लावण्याचो इच्छा होते. मंजूळेच्या पाटल्या गहाण टाकूण तो कारखान्याचा ट्रॅक्टर मागवतो. पण आवश्यकतेपेक्षा अधिक पैसे देऊन भष्ट्राचार करून, अवैद्य मार्गाने. त्याशिवाय त्याच्यापुढे दुसरा पर्यायच नसतो. परंतु जानूच्या हतबलतेचा फायदा घेऊन नंगरी बळीशा आणि ट्रॅक्टरचा ड्रॉयव्हर जानूची फसगत करतात. अवैद्य मार्गाने टॅक्टर बोलावलाय म्हटल्यावर रात्रीची नांगरणी करून ड्रायव्हर निघून जातो जानू सकाळी जाऊन पाहतो तो सगळी नांगरणी चुकीच्या पद्धतीने झालेली असते. पत्नीच्या सोन्याच्या पाटल्या गहाण ठेवून उभे केलेले पैसे वाया गेले. अशा रितीने जानू शोषण व्यवस्थेला बळी पडतो.

शोषण व्यवस्थेला बळी पडलेली आणखीन एक व्यक्तीरेखा म्हणजे रघू होय. लिगाड या लघुकादंबरीत 'रघू' नावाची शिक्षित होतकरू व्यक्तिची व्यक्तिरेखा मोहन पाटलांनी रेखाटली आहे. नोकरी सोडून तो गावाकडे शेती करण्यासाठी माघारी फिरतो गावात येऊन आपला भाऊ शिवाला घेवून शेती करू लागतो. उसाची लावण करतो. पण ऐन उन्हाळ्याच्या काळात उसाला पाणी कमी पडते. गावात सहकारी सोसायटी होती. प्रत्येकाला नंबरानं पाणी

मिळायचे पण त्यातही भ्रष्टाचार होत होता. दाजीतात्या नावाचा राजकीय पुढारी गावात होता. पाणी सोसायटीचा पाट सरळ दाजीतात्याच्या विहिरीत कोसळायचा. त्यामुळे पुढच्यांना पाणी कमी पडायचे. पाटकरी पैसे घेऊन भ्रष्टाचार करायचे. पैसे देणाऱ्याला अधिक पाणी द्यायचे.

रघू शिक्षित असला तरी दाजीतात्याविरूद्ध बोलायची त्याचीही हिंमत नव्हती. त्यामुळं तोही गुमान सारे सहन करत होता. दाजीतात्याच्या मुलगा बाजी. बाजी वाया गेला होता दारू पित होता. या बाजीने रघूच्या संडग पडलेल्या शेतातून ट्रॅक्टर नेण्याचा प्रयत्न केला. तेव्हा शिवाने त्याला दमदाटी करून रोखला होता. पुढे या बाजीने रघूचा पाण्याचा नंबर असतानाही पाण्याचा पाट अडवला. कारण होते ट्रॅक्टर उसातून जाऊ दिला नाही. म्हणून शेवटी रघूने बाजीतात्याकडे तक्रार केल्यावर पाणी त्यांना मिळते. पण याचा फायदा घेवून बाजी रघूच्या शेतातून ट्रॅक्टर घालतोच. रघूचे काही चालत नाही. शेवटी शिकला सवरला रघू हतबल ठरतो आणि आपल्यासमोर आलेल्या परिस्थितीला शरण जातो.

'लिगाड'मधील आणखी एक व्यक्तिरेखा म्हणजे शिवा. मोहन पाटील यांनी ग्रामीण जीवनात सामान्य शेतकऱ्याचे शोषण कसे आणि कोणकोणत्या मार्गाने होते याचे वास्तव चित्रण केले आहे. त्यासाठी त्यांनी 'लिगाड' मध्ये रघू हा जसा शिक्षित. शिक्षकी पेशा सोडून आलेला, परंतु गावातील शोषणाला बळी पडलेला दाखविला आहे. तसेच रघूचा भाऊ शिवा हा देखील शोषणाला कसा बळी पडतो याचे चित्रण केले आहे.

शिवा हा रघूचा भाऊ. रघू हा शिक्षित पण शिवा अज्ञानी. शिक्षणामुळे रघूकडे संयम, स्वनियंत्रण हे गुण होते. तर शिवा अनिर्बंध, रागिट, तापट स्वभावाचा आहे. अन्यायाला तो तितक्याच तडफेने जशास तसे उत्तर देण्याचा प्रयत्न करतो. पण रघू त्याला रोखण्याचा प्रयत्न करतो. कारण रघूला माहीत आहे की, दाजीतात्यासारख्या व्यक्तिशी टक्कर घेणे सोपी गोष्ट नाही.

शिवा तापट स्वभावाचा, वसकन कुणाच्याही अंगावर धावणारा आहे. म्हणूनच तो दाजीतात्याचा मुलगा बाजी सडंग रानातून टॅक्टर नेतोय हे पाहून बाजीलाच मारायला धावतो. गावातल्या एका सत्कार कार्यक्रमात शिवा स्टेज समोर जागा धरून बसलेला असतो. परंतु

दाजीतात्याचा बाजी त्याला ती जागा सोडायला सांगतो. हे सहन न झाल्याने शिवा सरळ बाजीच्या अंगाव्र धावून जातो. बाजीला खाली पाडून लाथा बुक्यांनी मारू लागतो.

परिणामांची पर्वा न करणारे व्यक्तिचित्रण म्हणजे शिवा. एका अस्सल ग्रामीण व्यक्तिचे चित्रण शिवाच्या रुपाने मोहन पाटील घडवितात . भर उन्हाळ्यामध्ये जेव्हा उसाला पाण्याची ओढ बसते. जॅकवेल थंड पडतो तेव्हा शिवा एक नामी युक्ती शोधून काढतो. लगम्या नावाचा एक गडी दाजीतात्याच्या मळ्यावर कामाला असतो. त्या लगम्याला फितवून शंभर रुपये त्याच्या हातावर टेकवून बाजीतात्याच्या विहिरीतील पाणी चोरून उसाला पाजण्याची ही युक्ति असते. लगम्याही तयार असतो. रघूही तयार होतो आणि लगम्याला शंभर रुपये देऊन शेताला पाणी सोडले जाते. पण कसे कुणास ठाऊक बाजीला ही बातमी लागते आणि बाजी विहिरीवरच्या मोटारीची फ्यूज काढून नेतो. यात लगम्याची काहीच चूक नसते.

जेव्हा शिवाला ही बातमी कळते तेव्हा त्याच्या तळपायाची आग मस्तकात जाते. दाजीतात्या बाजी, यांच्या अत्याचाराचा, पिळवणूकीचा त्याला प्रचंड राग येतो. धावतच तो विहिरीजवळ पोहोचतो. सारा प्रकार त्याच्या लक्षात येतो. रघूही धावत तेथे पोहोचतो. रघू येऊन पाहतो. मोहन पाटील शिवाचा तो अवतार वर्णन करताना लिहितात.

'शिवानं लगम्याला खाली पाडलेलं, वर उरावर बसून तो सारखा त्याला, तोंडावर छातीवर बुक्क्या हाणीत होता आणि लगम्या याऊले.. याऊले... म्हणून घसा फोडून ओरडत होता.'[९]

रघू येऊन दोघांचे भांडण सोडवितो. पण तरीही शिवाचा राग शांत होत नाही. अन्यायाविरूद्ध त्याची चिड पराकोटीला गेलेली असते, परिणामांची जाणीव त्याला रहात नाही आणि रागाच्या भरात तो लगम्याला, तात्याला, बाजीला शिव्या देत भले मोठे दगड विहिरीवरच्या मोटारीवर टाकू लागतो आणि लगम्याला दम देतो की, 'ध्येनात ठेव लगम्या...ह्यो मळा एकदा मी काडी लावून पेटविणार तवाच माझा ऊर थंड हुणार.'[१०]

सत्तापिपासू पुढाऱ्याच्या अत्याचाराला बळी पडलेली आणखी एक व्यक्तिरेखा म्हणजे 'लगम्या' ही होय. 'लगम्या' हे नाव मराठी नाही. हा कानडी शब्द आहे. मोहन पाटील ज्या

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

परिसराचे वर्णन आपल्या लघुकादंबऱ्यातून करतात तो परिसर कर्नाटकाच्या सीमेलगतचा भाग आहे. त्यामुळे त्यांच्या लेखणातून काही व्यक्तिरेखांची नावे कन्नड भाषेतून डोकावताना दिसतात.

'लगम्या' हा दाजीतात्याच्या मळ्यावरचा चाकरीचा माणूस. मूळचा कर्नाटकातला, विजापूर भागातला. तो भाग दुष्काळी, पीक पाणी नसल्यामुळे पोटासाठी लगम्यासारखी आजही अनेक माणसे कुटूंबासह पश्चिम महाराष्ट्रामध्ये स्थलांतरीत होताना दिसतात. लगम्याही कुटूंबासह आलेला. मोहन पाटील या लगम्याच्या व्यक्तिचित्रण रेखाटताना लिहितात. ' उंच काळा शिडशिडीत लगम्या... कातळागत काळा वाण. उंच अंगलट बीडी ओढून ओढून ओट काळेठिक्कर पडलेले. डोकीवर मेणचट काळी टोपी, लगम्याच्या एकाच कानात जाड पितळेची बाळी होती.'[११]

असा हा लगम्या दाजीतात्याच्या शेतावर राबराब राबायचा. रात्रंदिवस शेतीची राखण करायचा दाजीतात्या देईल त्या पैशात पोट चालवायचा. हा लगम्या देखील शोषित होता. दाजीतात्याच्या अन्यायाला बळी पडलेला होता. लगम्याची बायको उडाळ होती याचा फायदा तात्यानं उठवला. लगम्याला याचा संशय आला. दोघा नवराबायकोची भांडणं जुंपली. त्यात भांडण सोडवायला दाजीतात्याचाच पुढाकार. शेवटी लगम्याने बायकोच सोडून दिली. आता लगम्या दाजीतात्याच्या मळ्यावर गुमान चाकरी करत होता.

'लिगांड'मधील बजरंगाची व्यक्तिरेखा ही मुख्य व्यक्तिरेखा नाही. मोहन पाटलांनी पुढाऱ्यांच्या मुठभर सत्तापिपासू वृत्तीच्या लोकांच्या अन्यायाला, शोषणाला बळी पडलेल्या ज्या दुय्यम स्वरुपाच्या व्यक्तिरेखा, रेखाटल्या आहेत त्यातील एक व्यक्तिरेखा म्हणजे बजरंगाची. बजरंग शोषित असून त्याच्यावरील अन्यायाची तीव्रता रघू आणि शिवा यांच्यावरील अन्यायापेक्षा कितीतरी अधिक पटीने आहे.

बजरंग प्रकाशात येतो तो शकीमुळे आणि शकीवर दाजीतात्यानं केलेल्या अत्याचारामुळं. खरं तर बजरंग 'वांड' होता. गावात त्याचं नाव काढायची हिंमत कुणाच्यात नव्हती. त्याला कुस्त्यांचा नाद होता. असा हा पिळदार शरीराचा बजरंग बहिणीच्या प्रकरणाने

पार कोसळला. मोहन पाटील लिहितात. 'वाघासारखा बजरंग बहिणीच्या काळजीनं पार खंगून कोळसा झाला. उतरलेल्या खांद्यातनं बगळ्यागत वर निघालेलं मानगूट दाढीमिशीतनं दिसणारी नाकाच्या दांडीबरोबर उचलेली गालफडावरची हाडं. काहीच न बोलता एक हुमाण घातल्यागत तो असा गप्पच बसलेला बघुन एकाएकी मला वाटलं, हा माणूस ढासळणार आतनं पोखरून पोखरून लाकडागत ह्याचा भूगा झाला असंल.'[१२]

एकेकाळी पैलवान असलेल्या बजरंगाची अशी अवस्था झालेली...

शकीवर दाजीतात्यानी अत्याचार केला. पण याचं खापर दाजीतात्यानी बबन नावाच्या शकीच्या प्रियकरावर फोडलं शकीनं हे सारं बजरंगाला सांगितलं. पण दाजीतात्याला जाब विचारायची हिंमत बजरंगाची, वाघासारख्या बजरंगाची होत नाही. इतके दाजीतात्याचे गावावर वर्चस्व आहे. दाजीतात्याने आपल्या बहीणीवर अत्याचार केला, आपल्या बहिणीचे आयुष्य वाटोळे केले हे माहीत असूनही बजरंग दाजीतात्याविरूद्ध काहीच हालचाल करत नाही की आवाज उठवत नाही. उलट तो स्वत:च कुढत बसतो आणि सारा राग शकीवर काढतो. खऱ्या अर्थाने बजरंग प्रकृतीने शक्तीशाली असला तरी परिस्थितीसमोर हतबल आहे. शोषित आहे. पिडीत आहे. अन्यायाने गांजलेला आहे.

लकुळ्या चांभार ही खांदेपालट मधील गौण व्यक्तिरेखा. गावात व समाजाचा पुढारी म्हणून वावरणारा लकुळ्या. त्याचा भाऊ रामा चांभार. मोहन पाटील यांनी ग्रामीण जीवनातील राजकारण किती सत्ताध बनत चाललेले आहे याचे चित्रण 'खांदेपालट' या लघुकादंबरीतून केले आहे. त्यात लकुळ्या चांभार, यल्लाप्पा कांबळे, यासारखी सामान्य माणसं कशी नागविली जातात याचे चित्रण मांडतात. लकुळ्या चांभार हा जरी चांभार समाजाचा पुढारी असला तरी तो देखील शोषित आहे. पिडीत आहे. अत्याचारित आहे. त्याचीही अवस्था बजरंगासारखीच झालेली आहे. लकुळ्याचा भाऊ रामा. या रामाला राजी नावाची मुलगी असते. जी नवऱ्याला सोडून गावात माहेरी रहायला आलेली असते. या राजिविषयी गांव काय काय बोलायचा ? मारुती नावाच्या व्यक्तिबरोबर तिचे प्रेमसंबंध असतात. आणि ही बाब

गावातील पुढारी धोंडीनानांना समजते. आणि धोंडीनाना राजीवर अत्याचार करतो. राजीला हे सहन न झाल्याने ती धोंडीनानाच्याच मळ्यातल्या विहिरीत उडी टाकून जीव देते.

इकडे राजी गायब झाली म्हणून लकुळ्या आणि रामा तिचा गुपचूपपणे शोध सुरू करतात. पण होता होता ही बाब साऱ्या गावभर पसरते. आणि तिसऱ्या दिवशी रात्रीचं प्रेत विहिरीत तरंगायला लागतं.

रामा, लकुळ्याला शेवटपर्यंत राजीच्या आत्महत्येचं कारण समजत नाही. आत्महत्या म्हणजे आता पोलिस केस होणार जे लकुळ्याच्या परिस्थितीला पेलवणारे नव्हते. म्हणून लकुळ्या धोंडीनानाकडे धाव घेतो आणि धोंडीनाना आत्महत्येच्या प्रकरणाला अपघात घोषित करून राजीच्या मृतदेहाची विल्हेवाट लावतात.

**ब) सत्तापिसासू आणि स्वार्थी व्यक्तिरेखा :**

मोहन पाटील यांच्या लघुकादंबऱ्यांतून ग्रामीण राजकीय संघर्ष व्यक्त होताना दिसतो. सत्तेच विकेंद्रीकरण, ग्रामीण भागात निर्माण झालेली समांतर सत्तास्थाने यामुळे ग्रामीण भाग राजकारणातील डाव-प्रतिडावांनी ढवळून निघाला. यातूनच स्वार्थी, सत्तापिसासू, ढोंगी पुढाऱ्यांची फळी उभी राहिली. मोहन पाटील यांनी याच ढोंगी स्वार्थी पुढाऱ्यांचे चित्रण 'लिगाड' आणि 'खांदेपालट' या आपल्या लघुकादंबऱ्यातून केले आहे.

'लिगाड' मधून चित्रित होणारी दाजीतात्याची व्यक्तिरेखा म्हणजे स्वार्थी, सत्तापिसासू, मतलबी पुढाऱ्याची मध्यवर्ती प्रातनिधीक व्यक्तिरेखा आहे. दाजीतात्या पाणी सोसायटीचे चेअरमन आहेत. बड्या पुढाऱ्यांच्या पंक्तीला उठबस करणारे आहेत. गाव सगळा दाजीतात्याला वचकून असतो. एकवेळ अन्याय सहन करतील पण दाजीतात्या विरूद्ध एक शब्द बोलण्याची कुणात हिंमत नव्हती दाजीतात्या गावाच्या सोसायटीत, धान्य दुकानातून भ्रष्टाचार करीत होता. तर कारखान्यावर जाऊन तिथल्या डायरेक्टरांना पार्ट्या देऊन तिथेही स्वार्थ साधत होता. या दाजीतात्याचे वर्णन मोहन पाटील करतात. 'तात्या म्हणजे किडका साप, डिवचलं की फोडणार. म्हणून जो तो घाबरून.' [१३]

असा हा दाजीतात्या साऱ्या गावाला त्यानं वेठीला धरलेलें, त्याच्याविरूद्ध बोलायची कुणाचीही हिम्मत नव्हती. उन्हाळ्यात नदीचं पाणी आटायचं. पात्र कोरडं पडायचं. त्यामुळे सामान्य शेतकऱ्यांच्या पिकाला पाण्याची कमतरता भासायची. पीकं पाण्याअभावी वाळायची. त्यांची भिस्त सारी पावसावर असायची इतरांची पिकं अशी जीव टाकत असताना दाजीतात्याचा मळा मात्र हिरवागार वाऱ्यावर डुलणारी उंच पीकं. याचं सारं श्रेय दाजीतात्याच्या स्वार्थी वृत्तीला द्यावं लागेल.

सहकारी पाणीसोसायटीचा दाजीतात्या अध्यक्ष होता. त्यामुळे पाणी सोसायटीवर त्याची अनिर्बंध सत्ता चालायची आणि पाणी सोसायटीतला पाण्याचा पाट सरळ दाजीतात्याच्या शेतातल्या विहिरीत सोडलेला. म्हणजे सामान्य शेतकऱ्याला पाणी पुरायचे नाही पण दाजीतात्याची विहीर मात्र तुंडूब भरलेली असायची. सहकारी तत्त्व पायदळी तुडवून पाणी सोसायटीचं खाजगीकरण तात्यानं केलेलं आणि आपल्या सोईनं तो त्याचा वापर करीत होता.

या दाजीतात्याच्या अनेक भानगडी होत्या. जाधवाच्या शकीवर दाजीतात्यानं अत्याचार केला आणि प्रकरण अंगलट येऊ नये म्हणून बबन नावाच्या प्रियकरावर आळ घातला. बबन बळीचा बकरा ठरला. साऱ्या गावाला ही बातमी समजली. शकीच्या भावाला बजरंगालाही हे सत्य माहित होतं पण कुणाचीही दाजीतात्याला विचारायची हिंमत झाली नाही. मोहन पाटील लिहितात. 'तात्याचा विषय निघाला की, भोवतीच्या माणसांच्या तोंडावर अचानक मरणकळा पसरायची. क्वचित शिवा सारखा एखादाच धाडसानं बोलायचा. बाकी सगळे बैलागत थंड. मागं बजरंग जाधवाच्या बहिणीचं शकूचं प्रकरण गावभर गाजलेलं सगळी आपआपसांत चोरून बोल बोलली तात्याला काहीनी शिव्याही घातल्या पण सारं माघारी.. बडबडली. गप्प बसली. झालं पुन्हा प्रेत पाण्यात पडलं ते प्रकरण दडपलं. त्यावेळी एक बहाद्दरही असा पुढं झाला नाही. कोण कशाला नसतं लिगाड मागं लावून घेतोय...'[१४]

इतका गाव दाजीतात्याला वचकून असायचा.

मोहन पाटील यांनी उभी केलेली दाजीतात्याची व्यक्तिरेखा ही अपवादात्मक नसून बहुतांशी ग्रामीण भागातील सत्य चित्रण आहे. दाजीतात्यासारख्या व्यक्तिरेखा खेड्यागणीक पहायला मिळतात. त्यांच्या अत्याचाराला बळी पडतो आहे तो सामान्य माणूस.

दाजीतात्यासारख्या व्यक्ति सत्ता टिकविण्यासाठी काहीही करू शकतात. स्वार्थासाठी कोणत्याही थराला जाऊ शकतात. दाजीचा मुलगा बाजी. वाया गेलेला पोरगा. पण तरीही दाजीतात्या त्याच्यासाठी सारी खटपट करताना दिसतो. हा बाजी कायम दारू पिऊन टर्र असतो तरी त्याचा फॅक्टरीकडून सत्कार केला जातो. कारण बाजीनं म्हने एकरी नव्वद टन ऊसाचा टेनज पाडला होता जो उच्चांकी होता. ही सारी दाजीतात्याच्या डोकीतनं निघालेली युक्ती होती. दाजीतात्यानं साखर कारखान्यातल्या डायरेक्टरास्नी पार्ट्या चारून ऊसाचं टनेज वाढवून घेतलं होतं.

दाजीतात्यानं जसं जाधवाच्या शकीचं जीवन नासवलं तर लगम्या नावाच्या गरीब कष्टकऱ्याच्या बायकोचंही जीवन नासवलं त्या दोघा नवरा बायकोत भांडणं लावून त्यांना वेगळंही केले. असा दाजीतात्या स्वार्थी, मुत्सद्दी, मुरब्बी राजकारणी आहे. मोहन पाटील यांनी दाजीतात्याच्या साऱ्या कृष्णकारस्थानावर उजेड टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

सत्तापिपासू, स्वार्थी, राजकारणी, मुत्सद्दी म्हणून धोंडीनाना या व्यक्तिरेखेचा विचार करता येईल. धोंडीनाना हे गावचे सरपंच आहेत. त्यांचा दरारा आहे. धोंडीनाना सरपंच असले तरी महिना अखेरीस त्यांची मुदत संपणार होती कारण सर्वानुमते तसा ठराव झाला होता की, सरपंचपद आणि डेप्युटी सरपंचपद रोटेशन पद्धतीने ठेवायचे. ठराविक कालानंतर दुसऱ्याला संधी द्यायची. धोंडीनानांची मुदत संपत आली तरी ते सरपंच पद टिकविण्यासाठी राजकारणाचे डावपेच आखू लागतात. याचाच एक भाग म्हणून चांभार आणि महार समाजामध्ये तेढ निर्माण करणे.

धोंडीनानासारखे स्वार्थी पुढारी सत्ता मिळविण्यासाठी जाती व्यवस्थेला खतपाणी घालतात. जाती-जातीमध्ये तेढ निर्माण करतात. धोंडीनाना पाताळयंत्री माणूस आहे. चांभाराची राजी नवऱ्याला सोडून माहेरी राहायला आलेली तीचं त्याच गावातल्या एका

मारुती नावाच्या व्यक्तिशी संबंध होते. नानाला हे समजलं. नानानं मारुतीला मार मार मारला आणि राजीवर अत्याचार केला. राजीला हे सहन न झाल्याने तिने विहीर जवळ केली. सारे प्रकरण राजीबरोबर तळाला गेले. याविषयी लेखक म्हणतो.

'या प्रकरणांत नानांनी एकदम आंघोळच केली. राजीचं प्रेत आपल्या विहिरीत सापडलं म्हटल्यावर भानगड नको म्हणून त्यांनी पंचास्नी हाताशी धरून सारं मिटवलं. हिकडं लकुळ्याला, राम्याला पोलिसांची भीती घातली.'[१५]

राजीच्या प्रकरणाचा नानांना आणखी एक फायदा झाला तो म्हणजे गाव सगळा राजीच्या प्रकरणात गुंतला, सगळीकडे चर्चा सुरू झाली या काळात कुठल्याच पंचानं खांदेपालटीचा विषय काढला नाही. नानांना हेच हवं होतं. मग तेही तोंड मिटून गप्प बसले.

नाना इतके मुत्सद्दी, हुशार की, ते स्वत:च म्हणायचे 'आपुन नुसत्या पायानं मारल्याची गाठ कुणाला हातानं सुटत नाही.'[१६] इतका नानांचा स्वत:च्या मुत्सद्दीपणावर विश्वास होता गर्व होता. मोहन पाटील यांनी धोंडीनानाचं जे चित्र रंगवलं आहे ते वास्तविक पाहता सत्यांशानं भरलेलं आहे. नानासारखी वृत्ती असणारे अनेकजण आज सामान्य शेतकऱ्यांच्या, माणसांच्या मानगुटीवर बसलेले आहेत.

शंकर मांगुरे ही व्यक्तिरेखा 'बस्तान' मधून मोहन पाटील वाचकांसमोर आणतात. शंकर मांगुरे हा सत्तापिपासू म्हणून जरी व्यक्त होत नसला तरी तो स्वार्थी वृत्तीचा आहे. फसव्या वृत्तीचा आहे. स्वत:च्या स्वार्थ्यासाठी, पैसा, संपत्तीसाठी जळीतसाली वाड्यांची लूट केली.

'जळीत्साली' म्हणजे म. गांधीजींच्या हत्तेनंतर जी जाळपोळ झाली. त्या धुडगूसात शंकर मांगुरे म्होरक्या होता. वावटळीत दिवा लावणारी कलाबाज व्यक्ती म्हणून त्याची आधीच ख्याती होती. जळितात त्यानं मोठ्या पाच वाड्यांची लूट केली. त्याच्यासंगे आणखी दोघे साथीदार होते. मग वाटणीसाठी तिघांत तंटा सुरू झाला. माल लुटीचा. मामला ही अवघड होता. शंकर मांगुरेनं थोडं थोडं वाट्याला देऊन त्यांना गप्प बसवलं. म्हणजे चोरानाही लुटणारा हा शंकर मांगुरे होता. पुढे त्यानं ते धन नदीच्या डोहात लपवले. आणि धरपकड सुरू झाल्यावर तो फरारी झाला. दाढीमिश्या वाढवून गोसाव्यागत ध्यान करून तो कोरगावात गंगाई

या आपल्या थोरल्या बहिणीकडं आला. सुरवातीला त्यांन आजारपणाचं सोंग घेतलं. गंगाईनं आपल्या भावाची सेवा केली. चांगलं वर्षभर तो घरातून बाहेर पडला नाही मग हळू हळू वातावरण निवळल्यावर त्यानं ती संपत्ती हळू हळू बाहेर काढली पुढे तो घरजावई झाला आणि बायकोचीही संपतीही हडप केली.

शंकर मांगुरेनं कोरगावच्या गावठाण जवळ अर्धा एकर माळ खरेदी केला. मतनवाडीत पाच एकराचा माळ खरेदी केला माळालाच सिमेंटची मोठी इमारत बांधून त्यात किराणा मालाचं दुकान, लाकूड वखार टाकून जाम बस्तान बसवून राहिला.

**क) स्त्री व्यक्तिरेखा :**

मोहन पाटील यांच्या लिखाणातून पारंपारिक स्त्री व्यक्त होते. भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान आहे. त्यातही ग्रामीण संस्कृतीमध्ये ही संस्कृती अजून पाय घट्ट रोवून उभी आहे. ग्रामीण स्त्री अजूनही परावलंबी आहे. कुटूंबामध्ये महत्त्वाची भूमिका साकारूनही तिचे स्थान गौण आहे. पैशाशी तर तिचा काडीचाही संबंध येत नाही. ग्रामीण स्त्रीच्या जीवनात आर्थिक स्वातंत्र्य, स्वावलंबन या शब्दांना कुठेच स्थान नाही. मोहन पाटील यांनी अशा स्त्रियांचे चित्रण आपल्या लघुकादंबऱ्यातून केलेले आहे. त्यांच्या लेखनातून चित्रित होणारी स्त्री ही दु:खी, मागासलेली, परावलंबी, परंपरावादी, पतिव्रता, नवऱ्याला सर्वस्वी मानणारी आहे. स्वत:च्या शीलाला प्राणापेक्षा अधिक जपणारी आणि प्रचंड सोशिक अशी आहे.

**'पाचुंदा' तून व्यक्त होणाऱ्या स्त्री व्यक्तिरेखा :**

**१. मंजूळा :**

'कोंडमारा' या पाचुंदातील पहिल्या लघुकादंबरीतून मंजूळेची व्यक्तिरेखा रेखाटली आहे. मंजूळा अस्सल ग्रामीण, परंपरावादी स्त्री आहे. मंजूळेचे दु:ख डोंगराएवढे आहे. तरीही ती त्याबद्दल कुणाकडे तक्रार करीत नाही. मंजुळेचा पती जानू हा एक सामान्य शेतकरी शेतात येईल तेवढ्या उत्पन्नावर कुटूंब चालवणारा मंजूळेनंही त्याला साथ दिलेली. जानूचा संसार नेटाने चालवणारी मंजूळा. पण जानू एके दिवशी पुरुषी अहंकार दाखवितो. नंजूळेकडं दुर्लक्ष करतो. मंजूळा सहा महिन्याची गरोदर असते. आणि अचानक तिच्या पोटात दुखायला

लागतं. ती जानूला सांगते पण जानू तिलाच रागावतो. तिच्याकडं दुर्लक्ष करतो. आणि रात्रीची वेळ असताना, घरात दुसरे कोणी नसताना तशा अवस्थेतही जानू तिला टाकून मिरवणूक बघायला निघून जातो.

जानू जेव्हा पहाटे येतो तेव्हा पाहतो तो मंजूळेच्या पोटातील गोळा विरलेला असतो. पूढे तीन वर्षे मंजूळा अंथरूणाशी खिळून राहते. तिच्या अंगातली ताकतच नाहीशी होते. ताप चढतो. खोकल्यानं तर तिची हाडकातडं एक होतं. इतकी वाईट अवस्था मंजूळेची होऊनही आणि या अवस्थेला तिचा नवरा जानू जबाबदार असूनही मंजूळा जानूला कधीच बोलत नाही तिच्या या अवस्थेचे चित्रण करताना लेखक म्हणतो.

'पहिलं मूल सहा महिन्यातच मीठ विरघळून गेल्यासारखं रक्तापाण्यात मिसळून गेलं हे ह्याच्या करणीनंच असं तिला सारखं वाटायचं मनातल्या मनात ती चरफडत बसायची. दाताचं पाणी गिळीत मनातल्या मनात कुढायची पण जानूच्या तोंडावर कधी त्यातला एखादा शब्द उच्चारायची तिची छाती नव्हती. तो तरी काय करणार असं तिला वाटायचं सगळा जलमच फाटका.'[१७] एवढे होऊन मंजूळा जानूला काही बोलत नाही याचे कारण तिची छातीच होत नाही जानूला दोष द्यायची. ती बंडखोरीची भाषाही करत नाही उलट 'जानू तरी काय करणार' असे तिला वाटते. म्हणजे मंजूळा नियतीला, पुरुषप्रधान संस्कृतीला सरळ सरळ शरण जाते एवढेच नाही तर, पूढे जेव्हा जानूला नांगरणीसाठी दोनशे रुपयांची गरज पडते. पैसे नाहीत म्हणून तो हतबल, हताश होतो. अशावेळी मंजूळाच त्याच्या मदतीला धावून येते. आणि हातातल्या पाटल्या काढून गहाण ठेवून पैसे उभे करण्यास सांगते त्यावेळी ती म्हणते.

'पाटल्या घालून मला कुठं आता मिरवायला जायचं हाय तवा. अंगावरल सोनं सोबंलाबी आणि अडीनडीलाबी पुढं बघू म्हणं.' [१८] मंजूळेच्या ह्या कृतीतून ग्रामीण स्त्रीचा फार मोठा त्याग व्यक्त होतो. जो नवरा तिला संकटात एकटीला सोडून जातो. त्याच नवऱ्याला संकटातून सोडविण्यासाठी ती मदत करते.

मंजूळेचा त्याग, नवऱ्याला सर्वस्व समजण्याची वृत्ती, येईल त्या प्रसंगाला धीराने तोंड देण्याची तिची कुवत खरोखरच वाखाणण्यासारखीच आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## २. शकी

मोहन पाटील यांच्या 'लिगाड' या लघुकादंबरीतील शकी जाधव ही एक पिडीत, अत्याचारीत स्त्री आहे. मंजूळेच्या व्यक्तिचित्रणातून मोहन पाटील यांनी मंजूळेचा त्याग दर्शविला आहे. तर 'लिगाड' मधील शकीच्या व्यक्तिचित्रणातून पिडीत अत्याचारीत महिलेचं दु:ख मांडलेलं आहे. शकू ही जाधवांची लेक बजरंग जाधवाची बहीण नवरा वारल्यावर घरी तरणा दीर, ही घरात नको म्हणून सासऱ्यानं तिला माहेरी पाठविलेली. माहेरात ती बबन नावाच्या व्यक्तिच्या प्रेमात पडते. त्याच्यावर तिचं खूप प्रेम असतं. त्या दोघांनी पळून जाऊन लग्न करण्याचा निर्णयही घेतलेला असतो. पण ही गोष्ट दाजीतात्याला कळते. आणि दाजीतात्या त्यांना मदत करतो म्हणून शेतावर बोलावून घेतो आणि बबनला मारुन हाकलून लावतो. आणि शकीवर अतिप्रसंग करतो. शकीला जन्मातनंच उठवितो. सारा गाव बबनवरचं संशय घेतो. दाजीतात्या नामानिराळा होतो.

शकी साऱ्यांना सत्य सांगण्याचा प्रयत्न करते. पण कुणीच तिचं ऐकून घेत नाही. मोहन पाटील यांनी शकीचं दुहेरी दु:ख अत्यंत प्रभावीपणे मांडलेलं आहे. तिच्यावर झालेला अन्याय एकीकडे दुसरीकडे सख्खा भाऊ सत्य जाणून घ्यायला तयार नाही. तिला आता जगायची चोरी झाली होती. म्हणून ती म्हणते 'रघू आता मला मरायची सुदीक चोरी झाली....'[१९]

## ३. शकीची म्हातारी आई

मोहन पाटील यांनी जसे शकीचे दु:ख मांडले आहे तसे शकीच्या म्हाताऱ्या आईचे तिच्या जीवाला झालेल्या यातनांचे चित्रनंही केले आहे. माहेरी आलेल्या स्त्रीविषयी, पोटच्या पोरीविषयी ज्यावेळी नको ते ऐकायला, पहायला मिळते तेव्हा त्या आईची अवस्था काय होत. असेल याचे वर्णन मोहन पाटील करतात.

'म्हातारी आतल्या आत आवंढा गिळून ढसढसू लागली पिकून पाळ झालेलं तिचं तोंड अवघडलं. तोंडातनं दुसरा शब्दच फुटेना वाकागत शिपत झालेल्या डोक्रीत हाडकुळ्या मुठी रुतवून ती मुळुमुळू रडू लागली. ते बघून माझ्या पोटात कालवू लागलं. तिथं उभं राहवेना.'[२०]

शकीच्या आईची अवस्था इतकी दयनीय झाली होती की, तिला शकीची काळजीही लागली होती आणि संतापही येत होता. संतापाने ती शकीला शिव्या देत होती. तोंडाला येईल ते बडबडत होती आणि काळजीने पोखरत चालली होती.

### ४. चांभाराची राजी

मोहन पाटील यांनी मांडलेल्या खांदेपालट मधील चांभाराची राजी ही देखील अन्याय, अत्याचाराने पिडीत स्त्री व्यक्तिरेखा आहे. ती धोंडीनानासारख्या स्वार्थी पुढाऱ्याच्या वासनेला बळी पडलेली आहे. वासनेची शिकार झालेली आहे.

धोंडीनाना शेतात राजीवर अतिप्रसंग करतो. राजीला हे सहन न झाल्यामुळे ती धोंडीनानाच्याच शेतातल्या विहिरीत उडी टाकून जीव देते. राजी या प्रकरणाविषयी ब्र काढत नाही की कुणाकडे नानांची तक्रार करीत नाही. या प्रकरणाला वाचा न फोडता, सत्य लपवून ठेऊनच राजी मरून जाते. त्यामुळे शेवटपर्यंत अपराधी धोंडीनानाचे नाव लोकांसमोर येत नाही. राजीनेही या प्रकरणाला वाचा फोडण्याचा प्रयत्न केला असता तरी तिची अवस्था जाधवाच्या शकीसारखी झाली असती. जिवंत असून मेल्यासारखी कारण तिच्या बोलण्यावर कुणीच विश्वास ठेवला नसता, आणि ज्यांनी ठेवला असता त्यांचे नानाविरूद्ध बोलायची हिंम्मत करु शकले नसते.

### ५. भागिरथी

'भागिरथी' ही स्त्री व्यक्तिरेखा 'खांदेपालट' या मोहन पाटील यांच्या लघुकादंबरीतून चित्रित होताना दिसते ही व्यक्तिरेखा जरी लघुकादंबरीच्या उतरार्धात व्यक्त होत असली तरी तिचे स्थान गौण स्वरुपात व्यक्त होते. भागीरथी ही धोंडी नानांची पत्नी आहे. गावाला वेठीस धरणाऱ्या, अत्याचार करणाऱ्या, स्वार्थी, राजकीय पुढाऱ्याची पत्नी म्हणजे भागिरथी.

भागिरथी अधिक व्यक्त होण्यारे व्यक्तिचित्रण नसले तरी 'खांदेपालटमध्ये' जितकी जागा तिला प्राप्त होते त्याहून कित्येक पटीनी तिचे दु:ख आहे. एकीकडे स्वार्थी, हट्टी, राजकारणी असा धोंडीनाना सारखा नवरा तर दुरीकडे, व्यसणी दुर्वर्तनी मुलगा, बाळासाब. म्हणजे सुधारायच कोणाला हा प्रश्न भागिरथी बाईपुढे पडलेला होता.

नानांच्या लेखी पत्निला काहीच किंमत नव्हती केवळ बाळासाबाची आई आणि वाड्याची मालकीण एवढाच त्यांच्या लेखी पत्निला किंमत होती. नाना गावचे सरपंच जरी झाले तरी स्त्रीयांना त्यांच्या दृष्टीने गौण स्थान होते. म्हणजे पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्रीयांना दुय्यम स्थान असते अशी आपली आजवरची समजूत होती. पण ग्रामीण जीवनामध्ये स्त्रीयांना दुय्यम स्थान तर नाहीच तिय्यम स्थान किंवा कधी कधी स्थानच नसल्याचे प्रत्ययाला येते त्याचे उदाहरन भागिरथीच्या रुपाने मोहन पाटील लिहतात यासाठी ते लिहतात.

'भागिरथी, नानांचा तो आवाज पार आत सैंपाक घरातील अंधारात जाऊन थडकला. तशी तिथल्या गाढ अंधारात काकणं चपापली. लांबड्या सैपाकघरात चटचट पावलांचा आवाज उठला. खोल्या ओलांडून ती पावलं सोप्याच्या एका कोपऱ्यातल्या अंधाऱ्या चौकटीजवळ येऊन थांबली. '[२१]

म्हणजे भागिरथीला सोप्यात येण्याचा हक्क नव्हता. एकूण ग्रामीण स्त्रीच्या मर्यादाच यातून व्यक्त होतात. नानासारख्या सरपंच आणि प्रतिष्ठित समजल्या गेलेल्या घरांत स्त्रीयांविषयी हा दृष्टिकोन असेल तर सर्वसामान्य घरांत काय अवस्था असेल?

## ६. राधी

'पाचुंदा' या लघुकादंबरी संग्रहातील शेवटची लघुकादंबरी म्हणजे बस्तान. बापूची कथा असणारी ही लघुकादंबरी ज्यातून मोहन पाटीलांनी नवा विषय मांडण्याचा प्रयत्न केला आहे. बापू सारख्या शिक्षित तरुणाला नोकरी सोडून गावी परतावे लागते खेडेगावात आल्यावर त्याला आई आणि भावाशी भांडून स्वत:ची चूल मांडताना होणारा त्रास, कष्ट, दु:ख यातना याचे चित्रण बस्तानमध्ये चित्रित झाले आहे. बापूला या साऱ्या गोष्टीमध्ये साथ मिळते ती त्याची पत्नी राधीची. खरे तर बापूच्या आयुष्यात जेव्हा राधीने प्रवेश केला, तेव्हापासून त्याच्या संघर्षाला सुरूवात झाली. कारण बापूच्या आईचे म्हणणे होते की, बापूने शंकर मामाच्या मुलीशी लग्न करून घ्यावे. पण बापूने या नात्याला साफ नकार दिल्यामुळे बापूच्या आईने खडाभांडण धरले आणि नाईलाजाने बापूला वेगळी चूल मांडण्याचा विचार करावा लागला. नवऱ्याच्या या निर्णयाशी ठाम राहणाऱ्या राधीने त्याला चांगलीच साथ दिली. पहिल्यांदा बापू

ज्यावेळी नोकरीला गेला त्यावेळी सासूशी पटेना म्हणून त्याने राधीला काही महिन्याकरिता माहेरी सोडलेले पण पूढे तो तिला घेऊन आला तेव्हापासून राधी बापूला अधिकच जपू लागली. माया करू लागली. नवऱ्यावर उदभवलेल्या संकटात धीराने त्याच्या पाठीशी ठाम उभी राहीली. त्याला मदत केली. त्याची काळजी घेणारी अशी भारतीय संस्कृतीतील प्रातिनिधीक स्त्री मोहन पाटील यांनी 'बस्तान' मधून रेखाटली आहे.

**ड) इतर काही लक्षणीय व्याक्तिरेखा :**

मोहन पाटील यांनी लघुकादंबऱ्यातून कथानकाची गुंफन करताना पात्रांची गुंफनही कथानकाला अनुसरून आशी केलेली आहे. ज्यात स्वत:ची स्वभाववैशिष्ट्ये असणाऱ्या व्यक्तिरेखा आढळतात. काही सामान्य माणसांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या व्यक्तिरेखा आढळतात. तर काही दुय्यम व्यक्तिरेखा आढळतात. पण दुय्यम असल्या तरी कथानकाच्या दृष्टीने महत्वाचे कामगिरी बजावणाऱ्या काही व्यक्तिरेखा पुढील प्रमाणे सांगता येतील.

नंगरी बाळीशा ही व्यक्तिरेखा आपल्याला 'कोंडमारा' या लघुकादंबरीत भेटते. मोहन पाटीलांनी एक धूर्त व्यक्तिरेखा रेखाटली आहे ती म्हणजे नंगरी बाळीशाची. नंगरी बाळीशा हा गावात पत, वजन असणारा माणूस. ज्याचा कारखान्यात, सरकार दरबारी दरारा आहे. वशिला आहे. आणि याचाच उपयोग तो आपल्या वैयक्तिक लाभाकरिता करून घेतो कारखान्याचा ट्रॅक्टर नंगरी बाळीशाच्या शेतात नांगरणी करतो. तोही दिवसा ढवळ्या, एका ओळीत अगदी हायक्लास सऱ्या सोडतो. पण तोच ट्रॅक्टर जानूच्या रानाचं वाटोळं करतो यावरूनच नंगरी बाळीशाच्या धूर्तपणाची ओळख पटते. नंगरी बाळीशा आपल्या धूर्तपनाची ओळख करून देताना म्हणतो. 'तुझं काम बिन नवऱ्याचं मग ते आतल्या अंगानं कराय लागणार. ह्या ड्रायव्हरच्या तोंडावर एक वीसबर रुपय फेकाय पाहीजेत पन्नास साठ बाबूरावांस्नी सारलं पाहिजेत,... हे फकस्त तुझ्याकरता. मी बाबूरावाला सोता गळ घालून हे काम करणार. न्हाईतर गावात अशी कैक माणसं नोटा घिवून पाठीलागल्यात...'[२२]

'लिगाड' मधून व्यक्त होणारे पोक्त व्यक्तिचित्रण म्हणजे रघू आणि शिवाचे वडील मोहन पाटील यांनी पोक्त अनुभवी, अन्याय सहन करणारी अशी व्यक्तिरेखा रघूच्या

वडिलांच्या चित्रणातून साकारली आहे. गावात दाजीतात्याच्या विरोधात बोलायची कुणाची हिंमत नाही तिथं आपण का बोलून वाईट व्हायचं या पारंपारीक विचाराचे रघूचे वडिल रघूला वारंवार दटावून सांगत असतात. की दाजीतात्याच्या भानगडीत आपण नाक खुपसायचं नाही. कधी कधी ते रघूला रागावूनही समजावण्याच्या प्रयत्न करताना म्हणतात.

'रघ्या, जिभ हासडून दीन गळ्यातनं पुना असं बोल्लास तर सांगून टेवतो. तेच ते हाळ हिरीत पडू देत तुला का पंच्यात ही? तूला हितं ऱ्हायाचं असेल तर गप्प गुमान ऱ्हा न्हाईतर सूट तुझ्या नोकरीकडं'[२३]

रघू हा शिकलेला आहे. गाव सोडून परगावी काही दिवस नोकरी केलेला आहे. पण रघूच्या वडिलांच्या दृष्टिने रघू अजूनही पोक्त नाही. रघू गावांत काहीतरी परिवर्तन घडवू याविचाराने नोकरी सोडून माघारी येतो पण रघूचे वडील त्याला विरोध करतात. यापूर्वी कधी गावात परिवर्तन घडलं नाही. पूढेही घडणार नाही हा त्यांचा ठाम विश्वास.

एकूणच रघूचे वडील हे पंरपरावादी विचार सरणीचे  आहे ती परिस्थिती स्वीकारणारे, नियतीला सरळ सरळ शरण जाण्याची तयारी असणारे प्रवाहाविरूद्ध पोहले तर घरादारावर संकट कोसळेल. ह्यामुळे आपणही प्रवाहाविरूद्ध पोहायचे नाही. आणि पोहण्याच्या प्रयत्न करण्याऱ्या रघू, शिवालाही विरोध करायचा. अशा विचारसरणीचे रघूचे वडील मोहन पाटलांनी चित्रित केले आहेत.

'बस्तान' या 'पाचुंदा' तील शेवटच्या लघुकादंबरीतील महत्त्वाची व्यक्तिरेखा म्हणजे बापूची. बापू हा सुशिक्षित बेरोजगार आहे मोहन पाटील यांनी बस्तान या लघुकादंबरीतून वेगळाचा प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केला आहे. ही थोडीशी वेगळ्या धाटणीची लघूकादंबरी आहे. बापू हा या लघुकादंबरीचा नायक आहे.

हलाखीत दिवस काढून बापू कसातरी बी. ए. होतो. पूढे बी. एड. करून हायस्कूल मास्तर व्हायची बापूची खूप इच्छा होती. यासाठी दहा हजार रुपयांची गरज होती. बापूने खटपट केली. पण त्याच्या मामानं शंकर मांगुरेने आडवा पाय मारला. बापूने त्याच्याकडे पैशाची मागणी केल्यावर त्यांने बापूच्या आईच्या नावावरचे रान घानवट घालण्याची युक्ती

काढली. शिक्षणासाठी रानावर बोजा काढायचे बापूला पटले नाही. आणि त्यांन तो नाद सोडून दिला.

पुढे शंकरमामाच्या ओळखीने बापूला सुतगिरणीत नोकरी लागली. शिपाई म्हणून काम काय? झाडलोट करा, फरश्या पुसा, येणाऱ्या जाणाऱ्यांना चहा द्या. कपबश्या विसळा असली कामे. पगार होता सातशे. त्यातील दोनशे कँटीनच्या बिलातच जायचे. उरलेल्या पाचशेत सारा खर्च निभवायचा बापूची कसरत व्हायची. बापूला वाटले होते बी. ए. पर्यंत आपलं शिक्षण आहे. आज ना उद्या क्लार्कची नोकरी मिळेल पण तीन वर्षे झाली. तरी कपबश्या उचलण्याशिवाय दुसरे काम नव्हते.

मोहन पाटील यांनी ग्रामीण परिसरातील सुशिक्षित तरुणांची होणारी हेळसांड, अवहेलना, ग्रामीण भागातला म्हणून मिळणारी दुय्यम वागणून हा ज्वलंत प्रश्न बापूच्या व्यक्तिचित्रणातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. बापू वैतागून नोकरी सोडून गावी परतातो. परंतु गावी परतल्यावर दुसरेच ताट त्याच्या पूढे वाढून ठेवलेलं तो माहेरी सोडलेल्या राधीला परत घेऊन येतो. वेगळी चूल मांडण्याचा प्रयत्न करतो. पण त्याची आई आणि भाऊ चंद्या दोघेही त्याला विरोध करतात. भरीस भर म्हणून शंकर मामाही विरोध करतो.

बापूचा संघर्ष सुरू राहतो. शेवटी बस्तान बसविण्यासाठीच्या अविरत खटपटीतून त्याला रानाची वाटणी मिळते. आणि तो राधीला घेऊन रानात बस्तान बसविण्यासाठी निघून जातो.

मोहन पाटील यांनी बापूची संघर्षमय कथा टिपलेली आहे. बापूचा संघर्ष इतरांशी परक्यांशी नाही तर स्वतःच्या नातलगांशी आहे. आई, भाऊशी आहे.

**सारांश :**

या पकरणात आपण मोहन पाटील यांच्या लघुकादंबऱ्यातील वातावरणनिर्मिती आणि व्यक्तिरेखांचा विस्तृतपणे अभ्यास केला. पाटील यांच्या लघुकादंबऱ्यात महाराष्ट्र कर्नाटक या सीमाभागातील ग्रामीण परिसाराचे चित्र्ण येते. हा परिसर त्यांच्या कथानकाला आधिक सकस आणि उठाव मिळवून देतो. पाटील यांच्या निवेदनांतून येणारा तपशिल कथालकाला अधिक

ठळक करुन टाकतो. त्याबरोबरच मोहन पाटील यांच्या व्यक्तिचित्रणात अनेक थरातील, पंथातील, जातीपातींचे स्त्री पुरुष अशी विविधता दिसून येते. त्यांच्या लघुकादंबऱ्यातून चित्रित झालेला ग्रामीण माणूस हा कष्टाळू आहे. त्याबरोबरच सत्तापिपासू, लबाड व बेरकी आणि चंगळवादी प्रवृत्तीच्या पुरुषांचेही चित्रण येते. मोहन पाटील आपल्या लघुकादंबऱ्यातून विविधांगी स्त्री जीवनाचे चित्रण करतात. या स्त्री जीवन चित्रणाला पाटील यांचा वास्तव अनुभवांचा स्पर्श आहे म्हणून हे स्त्रीचित्रे गडदपणे वाचकासमोर प्रकट होतात. खानदाणीपणा, सामाजिक प्रतिष्ठा पुरुषसत्ताक पध्दती अशा अनेक गोष्टींना या स्त्रिया बळी पडतात. एकुणच भारतीय संस्कृतीत स्त्रीच्या उपेक्षितपणावर मोहन पाटील प्रकाश टाकतात.

**संदर्भ**


१. मोहन पाटील, '*कोंडमारा*', '*पाचुंदा*' पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, प्रथम आवृत्ती, २००२, पृ. २१

२. मोहन पाटील, '*बस्तान*', उ. नि. पृ. १९०

३. मोहन पाटील, '*कोंडमारा*', उ. नि. पृ. १

४. मोहन पाटील, '*फुलपाखरु*', उ. नि. पृ. २३

५. मोहन पाटील, '*लिगाड*', उ. नि. पृ. ५५

६. चंद्रकांत बांदिवडेकर, '*मराठी कादंबरीचा विकास*', पुणे, व्हिनस प्रकाशन, तृतीय आवृत्ती, १९७३, पृ. १३३

७. मोहन पाटील, '*कोंडमारा*', उ. नि. पृ. १

८. मोहन पाटील, '*कोंडमारा*', उ. नि. पृ. ५

९. मोहन पाटील, '*लिगाड*', उ. नि. पृ. ९६

१०. मोहन पाटील, '*लिगाड*', उ. नि. पृ. ९७

११. मोहन पाटील, '*लिगाड*', उ. नि. पृ. ७७

१२. मोहन पाटील, '*लिगाड*', उ. नि. पृ. ७१

१३. मोहन पाटील, '*लिगाड*', उ. नि. पृ. ८१

१४. मोहन पाटील, '*लिगाड*', उ. नि. पृ. ८१

१५. मोहन पाटील, '*खांदेपालट*', उ. नि. पृ. १३०

१६. मोहन पाटील, '*खांदेपालट*', उ. नि. पृ. ४०

१७. मोहन पाटील, '*कोंडमारा*', उ. नि. पृ. १२

१८. मोहन पाटील, '*कोंडमारा*', उ. नि. पृ. १३

१९. मोहन पाटील, '*लिगाड*', उ. नि. पृ. ६९

२०. मोहन पाटील, '*लिगाड*', उ. नि. पृ. ६८

२१. मोहन पाटील, '*खांदेपालट*', उ. नि. पृ. १४०

२२. मोहन पाटील, '*कोंडमारा*', उ. नि. पृ. ११

२३. मोहन पाटील, '*लिगाड*', उ. नि. पृ. ७५